बी.ए तृतीय वर्ष
अभ्यास पत्रिका नववी- मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतीहास प्रारंभ ते १६00
विषय- लिळा चरित्राचे स्वरूप

डॉ. नवनाथ ज्ञानोबा पवळे (मराठी विभाग)
कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर कासार

रचनाकाळ :

'लीळाचरित्र' हा केवळ महानुभाव वाङ्मयाचा नव्हे तर मध्ययुगीन मराठी वाङ्मयामधील पहिला गद्य ग्रंथ होय. या ग्रंथाचा लेखनकाळ पंथीय प्रचलित मतानुसार शके १२०० आहे. शके ११९६ मध्ये श्रीचक्रधरस्वामींनी उत्तरापंथे प्रयाण केल्यानंतर साधारणपणे चार वर्षांचा कालावधी 'लीळाचरित्र' ग्रंथ सिद्ध होण्यास लागला.

**श्रीम्हाइंभट जीवनवृत्तांत :**

आद्य चरित्रकार श्रीम्हाइंभट यांचे अहमदनगर जिल्ह्यातील 'सराले' हे जन्मगाव. ब्राह्मण कुळातील षट्शास्त्र संपन्न म्हाइंभट संस्कृत पंडित होते. गणपत आपयो हे त्यांचे मामा आणि सासरेही. म्हाइंभटांचा पाच शास्त्रांचा अभ्यास गणपत आपयोजवळच झाला म्हणून गणपत आपयो हे त्यांचे गुरूही होते. सहावे 'प्रभाकर शास्त्र' महाराष्ट्रात अभ्यासता येत नव्हते. हे शास्त्र महाराष्ट्रात अभ्यासणाऱ्यास कोड फुटते किंवा त्यांचा निर्वंश होतो असा समज रूढ होता. म्हणून तेलंगणातील विद्यानगरीत प्रभाकरशास्त्र अभ्यासण्यासाठी महाइंभटांना जावे लागले. प्रभाकरशास्त्राचा अभ्यास करण्यापूर्वी परीक्षा घेतली जात असे. जो त्यात उत्तीर्ण होईल त्यालच प्रभाकरशास्त्र शिकविले जाई. परीक्षा अत्यंत कठीण होती. मंदिराच्या गाभाऱ्यातील देवतेस विडा वाहण्यास पाठविले जात असे. विडा वाहताना त्या देवतेवर बांधलेल्या घंटीस स्पर्श न होऊ देता अंधारात असलेल्या मूर्तीवर विडा वाहावा लागे. तेथील पंडितांनी म्हाइभटांची परीक्षा घेतली. म्हाइंभटांनी तीन वेळा विडा अर्पण केला पण घंटीला स्पर्श होऊ दिला नाही. ते परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची अचाट प्रज्ञा, कुशाग्र बुद्धिमत्ता पाहून तेथील पंडितांनी म्हाइंभटास प्रभाकरशास्त्राचा अभ्यास सांगितले. इतरही बऱ्याच शास्त्रांचा त्यांनी अभ्यास केला.

शास्त्रपारंगततेमुळे त्यांना विद्वत्तेचा गर्व चढला. विद्या अहंकारामुळे ते इतर पंडितास तुच्छ लेखू लागले. पैठणसह गंगातीराच्या सर्वच विद्वानांशी शास्त्रार्थ करून त्यांना निरुत्तर केले. त्यामुळे तर म्हाइंभटांचा अहंकार अधिक दुणावला. ते चालताना पायात तृणाची वांकी म्हणजेच वाळलेल्या गवताचे कडे घालून, हातात दिवसा पेटती दिवटी घेऊन चालत असत. त्यामागचा संकेत हाच की गोदातीरावरील सर्व विद्वान माझ्या पायातील कड्याप्रमाणे तृणवत असून आकाशात जसा एक तळपता सूर्य तसा भूतलावर मी 'माहिया' नावाचा एक ज्ञानसूर्य असा अहंकार बाळगून ते वावरत असत. गणपत आपयोकडून पाच शास्त्रांचा अभ्यास झालेला असल्यामुळे त्यांच्याबद्दल म्हाइंभट थोडा फार आदर बाळगून होते.

बाळगून होते.

गणपत आपयो यांच्या सांगण्यावरून म्हाइंभटांनी श्रीचक्रधरस्वामींशी जेव्हा शास्त्रार्थ केला तेव्हा श्रीचक्रधरस्वामींच्या श्रीमुखातून ऐकलेले निरुपण म्हाइंभटाच्या अंत:करणात परिवर्तन करणारे घडले. त्यांच्या ठायी असलेला अहंकार गळून पडला व ते स्वामींच्या श्रीचरणावर नतमस्तक होऊन यथार्थ ज्ञानाची जाणीव करून घेण्यासाठी विनम्र होऊन बसले. स्वामींनी त्यांना पूर्वी पंचकृष्ण, हत्तीचा दृष्टांत, सुरीचा दृष्टांत, उद्धरण व विचार प्रकरणातील काही सूत्रे निरुपण केली. स्वामींच्या काही क्षणांचा हा सहवास लोह परिसराप्रमाणे म्हाइंभटाच्या जीवनाला सुवर्णांकित करून गेला.

स्वामींकडून झालेल्या यथार्थ ज्ञानाच्या जाणीवेमुळे म्हाइंभटांच्या अंतरात वैराग्य भावना उत्पन्न झाली व गृहस्थाश्रमाचा त्याग करून पुढे ते श्रद्धपूर येथील परमेश्वर अवतार श्रीगोविंदप्रभू यांच्या सान्निध्यात अनुसरले.

## ग्रंथ कर्तृत्व :

म्हाइंभटांच्या नावावर अधिक ग्रंथांची रचना नसली तरी त्यांच्या 'लीळाचरित्र' या एकाच ग्रंथाने त्यांचे कर्तृत्व अजरामर झाले आहे. ही त्यांची अमर कृती सारस्वताच्या उपासकांना अविस्मरणीय राहील. याशिवाय श्रीगोविंदप्रभू चरित्र, श्रीकृष्णचरित्र, सैंह्याद्रीलीळा, अज्ञातलीळा यांचे संकलन व जतीचा दशकू म्हणजे दहा आतऱ्या असलेली एक स्फुटरचना, निर्वचन स्त्रोत्र, प्रार्थना स्त्रोत्र आदी स्फुटरचना त्यांच्या नावावर आढळून येतात.

**ग्रंथनिर्मितीची प्रेरणा :**

श्रीस्वामींच्या अमोधश्रावीया लीळांचा ठेवा स्वामीभक्तांच्या अंतरंगात आठवणींच्या रूपाने मौखिक स्वरूपात होता. स्मरणभक्तीचा हा प्रवाह अखंडितपणे प्रवाहित राहावा म्हणून या लीळा समुच्चयांना ग्रंथनिविष्ठ करण्याची श्रीम्हाइंभटांना प्रेरणा झाली ती एका विशिष्ट प्रसंगातून. श्रीस्वामींनी उत्तरेकडे बीजे (प्रयाण) केल्यानंतर त्यांच्या पश्चात या पंथाची धुरा स्वामींचे पट्टशिष्य पंथाचे प्रथमाचार्य श्रीनागदेवभट यांनी सांभाळली. आचार्य श्रीभटोबास ऊर्फ श्रीनागदेवभट शिष्यपरिवारासह ऋद्धपूर अर्थात परमेश्वरपूर येथे श्रीगोविंदप्रभू या ईश्वर अवताराच्या सान्निध्यात राहू लागले. अर्थात यामागे श्रीस्वामींचीच त्यांना आज्ञा होती. स्वामींच्या पश्चात ईश्वर वियोगाच्या दु:खाचे कढ पचवीत आचार्य श्रीभटोबास सर्व शिष्य परिवारासह ऋद्धपूर येथे काल क्रमू लागले. श्रीभटोबास प्रतिदिन श्रीप्रभूंचे सेवादास्य करीत. तिन्ही पूजावसर पाहत नगरात भिक्षा करीत. उर्वरित वेळेत एकांत स्थळी बसून श्रीस्वामींच्या लीळा, निरोपलेले शास्त्र यांचे निरंतर [illegible] करीत असत. आचार्यांचा हा चिंतन विधी बघून कुशाग्र बुद्धीच्य[illegible]हाइंभटांना उत्सुकता निर्माण

झाली. आचार्य रोज कशाचे चिंतन करीत असावेत हे जाणून घेण्यासाठी त्यांनी आचार्यांनाच प्रश्न केला, 'हा भटो ! तुम्ही निरंतर काईसेयाचे मनन करीत असा ? तुम्हासी केव्हळाइ मनना वेगळा न खो..'' म्हाइंभटांच्या या प्रश्नाचे उत्तर देताना आचार्यांनी सविस्तर खुलासा करीत म्हटले की, श्रीस्वामींचीच आज्ञा आहे की, ''वानरेया, येथूनि निरोपिले विचारशास्त्र: ज्ञान तयाचे श्रवण मनन निदिध्यासन करीजे तेही एक स्मरणचि किंगा: एथिची चरित्रे आठवजेति: आईकिजेति: उच्चारिजेति तेही एक समरणचि किंगा:'' म्हणून मी स्वामींच्या शास्त्राचे, लीळांचे चिंतन, मनन करीत असतो. हे ऐकून म्हाइंभट म्हणाले, ''आपणास श्रीस्वामींचा वर म्हणून आपण त्यास आठवू शकता, स्मरू शकता; पण आता आम्हास असन्निधानी ते कसे शक्य होईल? शिवाय पुढे जो सर्वज्ञांचा परमार्ग वाढेल त्यांना कसे शक्य होईल? यासाठी जर आपणच मला या सर्व लीळा सांगितल्या तर मी लिहून काढेन.'' म्हाइंभटांची ही कल्पना आचार्यांना खूप भावली. ते म्हणाले, ''हो लिहिले तरी मार्गाची उपयोगा जाईल: म्हणोनि हे निके विचारिले'' अशी म्हाइंभटांची प्रशंसा करीत आचार्य उद्गारले. या घटना प्रसंगातून 'लीळाचरित्र' ग्रंथनिर्मितीची प्रेरण मिळाल्याचे स्पष्ट होते.

### लीळाचरित्राचे स्वरूप :

'लीळाचरित्रा'चे स्वरूप संकलनात्मक आणि संशोधनात्मक आहे. भटोबासांनी स्वत: श्रीस्वामींच्या सान्निध्यात येण्यापूर्वी बाइसा विद्यमानीच्या ज्या लीळा सांगितल्या त्यास म्हाइंभटांनी 'पूर्वार्ध' असे नाव ठेवले आणि भटोबासांच्या अनुसरण लीळेनंतरच्या पुढील सर्व लीळा यास 'उत्तरार्ध' असे नाव दिले. या पूर्वार्ध-उत्तरार्ध लीळांच्या संख्येबद्दल मात्र संदिग्धता आढळून येते. लीळाचरित्राचे जे अनेक वेगवेगळे पाठभेद निर्माण झाले त्यात लीळांच्या संख्येमध्ये सारखेपणा जाणवत नाही.

चरित्रग्रंथ निर्मितीमध्ये म्हाइंभट संकलक, संशोधक आणि लेखक अशा तिहेरी भूमिकेतून आपल्यासमोर येतात तर आचार्य श्रीभट्टोबास मार्गदर्शकाच्या भूमिकेत भेटतात.

**भाषावैभव :**

'लीळाचरित्रा'मुळे आपल्याला यादवकालीन बोलीभाषेचे लौकिक स्वरूप सहजतेने कळू शकते. त्यातील ओघवती भाषा, वाक्यरचनेतील लघुत्व, अल्पाक्षरत्व, वाकप्रचार, व्यवहारातील रूढ शब्दांचा वापर, त्या शब्दातील नादमाधुर्य, आत्मनिवेदनातील रसाळता, निरुपणातील सहजता हे सारेच कसे गोडवा निर्माण करते. पुन्हा पुन्हा वाचत राहावे असे वाटते. ही भाषेतील अविटता म्हाइंभटांच्या लेखनाचे खास वैशिष्ट्य ठरते. यादवकालीन मराठी भाषेचे लौकिक स्वरूप जे 'ज्ञानेश्वरी'सारख्या काव्यग्रंथावरून कळू शकत नाही ते 'लीळाचरित्रा'तून उत्तमरीत्या कळते. लोकपरंपरेने चालत आलेली काऊचिऊची कहाणी लीळाचरित्र सांगते.

लीळाचरित्राचे भाषिक महत्त्व प्रतिपादन करताना डॉ. तुळपुळेंच्या त्या विधानाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. ते म्हणतात, ''भाषा कशी असावी ते 'ज्ञानेश्वरी'सारखे अनेक ग्रंथ सांगतील; पण भाषा कशी होती हे एक 'लीळाचरित्र'च सांगू शकेल.'' यावरूनच आपणास लीळाचरित्राचे भाषाभ्यासाच्या दृष्टीने काय महत्त्व आहे हे लक्षात येईल.

**लेखन कौशल्य :**

म्हाइंटभटाचे लेखन कौशल्य म्हणजे दोन किंवा तीन शब्दांचीच वाक्यरचना. एखादा प्रसंग ते अगदी थोडक्या शब्दांत साकारतात. उदा. ''बाइ तै सराचे दी:'', ''बाइ: तयातव तयाचा निर्वंश जाला:'', ''धुरे! एकी पवाडु आति?'', ''हे दुसी होईल: तुम्ही ग्राहीक व्हा:''

शब्दचित्रे रेखाटण्यातले त्यांचे कसब वाखाणण्याजोगे आहे. गद्यसुद्धा बेमालूमपणे काव्यमय होऊन जाते. एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिचित्र रेखाटण्याचे कौशल्यही किती खुमासदार आहे याचा प्रत्यय 'पर्वति क्रिडा: मुक्ताबाईए भेटि: स्तिती:' या लीळेतील 'पहाळी गेली लव: चोंभळी वळिली नखे: भूई काढिती जटै: मुक्ताबाई ऐसे नाव: ऐसे गोसावी भक्तीजनाप्रती सांगितले' या वाक्यरचना वाचल्यानंतर सहज येतो.

म्हाइंभटाची ही लेखनशैली लीळाचरित्राचे वाङ्मयीन सौंदर्य खुलविण्यास विशेषत्वाने कारणीभूत ठरते. सुटसुटीत वाक्यरचना,

- धन्यवाद